सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महासंस्कृती

# शास्त्रीय व लोककला क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांची नोंदणी

विविध सांस्कृतिक कला प्रकारात सहभाग घेणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना इ. १० वी च्या परिक्षेत अतिरिक्त गुण देण्याबाबतच्या शासनाचे धोरणानुसार पात्र विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्यासाठी निकषानुसार शास्त्रीय व लोककला क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांची सांस्कृतिक कार्य विभागाकडे नोंदणी करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

**संस्था नोंदणीसाठी खालीलप्रमाणे निकष मान्य करण्यात आलेले आहेत :–**

**अ. शास्त्रीय नृत्य, गायन व वादन यांचे शिक्षण देण्याऱ्या संस्था**

१. सदर संस्था किमान ५ वर्षापासून अस्तित्वात असणे आवश्यक.
२. सदर संस्थेची नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे झालेली असावी.
३. सदर संस्थेचे मागील ३ वर्षाचे लेखापरिक्षण (ऑडिट) झालेले असावे.

**ब. लोककला**

१. **पूर्ण वेळ तमाशा फड / ढोलकी फड** : – एका वर्षात तमाशाचे किमान १०० प्रयोग सादर करणारे कलापथक.
२. **हंगामी तमाशा फड** : एका वर्षात किमान ५० प्रयोग करणारे पथक.
३. **दशावतार मंडळ** : एका वर्षात १०० प्रयोग करणारे कोकणातील पारंपरिक दशावतार खेळ सादर करणारी व्यावसायिक मंडळे.
४. **खडीगंमत कलापथके** : एका वर्षात किमान १०० कार्यक्रम सादर करणारे विदर्भ भागात पारंपरिक खडीगंमत कलाप्रकार सादर करण्याचा पूर्णवेळ व्यवसाय करणारी कलापथके.
५. **शाहिरी कलापथके** : एका वर्षात किमान १०० कार्यक्रम सादर करणारी केवळ पारंपरिक पोवाडे सादर करण्याचा पूर्णवेळ व्यवसाय करणारी कलापथके.
६. **लावणी कलापथके (संगीत बारी)** : संगीत कला केंद्रावर किमान ५ वर्षे पारंपरिक लावणी प्रकार सादर करणारी पथके.
७. **प्रयोगात्मक लोककला** : वर नमूद केलेल्या ६ कलांव्यतिरिक्त इतर कोणतीही लोककला जीचे किमान ५० प्रयोग झालेले आहेत.

सादर केलेल्या प्रयोगांबाबत कार्यक्रमाची छायाचित्रे, जाहिरात, कार्यक्रमाच्या तिकीट विक्रीचे पुरावे, निमंत्रणपत्रिका, हॅण्डबिल, कार्यक्रम सादर केल्याबाबत ग्रामसेवक/ नगरपालिका /महानगरपालिका यांचे दाखले यांचेसह परिपूर्ण अर्ज (सदर अर्जाचा नमूना www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर **नवीन संदेश** या शिर्षकाखाली उपलब्ध आहे.) दि. ५ ऑगस्ट, २०१७ पूर्वी सांस्कृतिक कार्य संचालनालय, विभागीय कार्यालय बंगला नं. ४, विमानतळ रोड, येरवडा, पुणे – ०६, येथे कार्यालयीन वेळेत पाठविण्यात यावेत. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र. ०२०- २०२७१३०१ / २६६८६०९९ ईमेल puneculture1@gmail.com येथे संपर्क साधावा.

# अर्जाचा नमुना

| अ. क्र. | बाब | संस्थेची माहिती |
|---|---|---|
| १ | अ) संस्थेचे नाव : | |
| | ब) संस्थेचा पत्ता : | |
| | क) दुरध्वनी : कार्यालय / भ्रमणध्वनी | |
| | ड) ई-मेल आयडी: | |
| | इ) वेबसाईट (असल्यास) : | |
| २ | संस्थेच्या स्थापनेचे वर्ष | |
| ३ | संस्था नोंदणी अधिनियम / सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणी क्रमांक (संस्थेच्या नोंदणीच्या प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.) | |
| ४ | संस्थेचे कार्यक्षेत्र (शहरी / ग्रामीण / औद्योगिक / आदिवासी) | |
| ५ | संस्थेचे प्रयोगात्मक कलेमधील कार्याचे उद्दिष्ट (सादरीकरण / जतन / संवर्धन) | |
| ६ | मागील ३ आर्थिक वर्षात संस्थेने लेखापरिक्षण केले आहे काय? त्याबाबतचे लेखापरिक्षणाचे अहवाल. (लोककला कलाप्रकारात काम करणाऱ्या संस्थाना हा मुद्दा लागू नाही.) | |
| ७ | मागील ३ वर्षात संस्थेने कोणत्या कलाक्षेत्रात व कोणत्या स्वरुपाचे कार्य केले आहे? त्याबाबत थोडक्यात माहिती. | |
| ८ | संस्थेने कलाक्षेत्रात राज्य / देश पातळीवर केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची थोडक्यात माहिती (त्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.) | |
| ९ | मागील ३ आर्थिक वर्षात केंद्र शासन / राज्य शासन यांच्याकडून कलाक्षेत्रातील कार्याबद्दल अनुदान मिळाले असल्यास त्याबाबतची माहिती (संबंधित आदेशाची छायांकित सत्यप्रत) | |

दिनांक :

**अध्यक्ष / सचिव**

स्थळ :

**नाव, पत्ता व स्वाक्षरी**